# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 April 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात पाव टक्क्यांनी कपात केली असून, रेपो दर सव्वा सहा वरुन सहा टक्के इतका करण्यात आला आहे. बँकेचं आर्थिक वर्ष २०२५-२६ चं पहिलं द्वैमासिक पतधोरण आज गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं. रेपो दरात कपात केल्यामुळे गृह आणि वाहन कर्ज स्वस्त होणार आहे. स्थूल, आर्थिक पिरस्थिती आणि भविष्यातील दृष्टीकोनाचं सविस्तर मुल्यांकन केल्यानंतर पतधोरण आढावा समितीनं रेपो दर कमी करण्याचा निर्णय एकमतानं घेतल्याचं मल्होत्रा यांनी सांगितलं. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण देशांतर्गत उत्पन्न – जीडीपीचा दर साडेसहा टक्के राहील असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. अमेरिकेनं प्रति आयात शुल्क लावल्याच्या पार्श्वभूमीवर जगभरात अनिश्चितेतचं वातावरण आहे, त्यामुळे याचा प्रभाव निर्यातवर पडू शकतो अशी शक्यता त्यांनी वर्तवली. सेवा आणि कृषी क्षेत्रात मात्र तेजी आहे तसंच थेट परकीय गुंतवणुकीचा ओघही कायम असल्याचं त्यांनी सांगितलं. महागाई दरही नियंत्रणात असल्याचं मल्होत्रा यांनी सांगितलं.

****

नवकार महामंत्र ही अध्यात्मिक प्रार्थना केवळ एक मंत्र नसून, आस्थेचं केंद्र असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवकार महामंत्र दिनानिमित्त आज नवी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. हा महामंत्र स्व पासून समाजापर्यंत आणि जन पासून ते जगापर्यंतचा मार्ग दाखवतो, असं पंतप्रधान म्हणाले. यावेळी त्यांनी १०८ पेक्षा अधिक देशांतून आलेल्या नागरीकांसोबत नवकार महामंत्र जपाचं पठण केलं.

नवकार महामंत्र दिवस हा आध्यात्मिक सुसंवाद आणि नैतिक जाणीवेचा एक महत्त्वपूर्ण उत्सव समजला जातो. जैन धर्मातील आदरणीय आणि सार्वत्रिक जप

असलेला नवकार महामंत्र सामूहिक पठणाद्वारे लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतो.

****

विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे आज नांदेड दौऱ्यावर असून, त्यांचं सकाळी गुरु गोविंदसिंघजी विमानतळावर स्वागत करण्यात आलं. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले उपस्थित होते.

****

दरम्यान, मुंबईत काल महापालिकेच्या बैठकीत राम शिंदे यांनी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मुंबईत चर्चगेट स्टेशन जवळ असलेल्या पुतळ्याचं आणि परिसराचं सुशोभीकरण करण्यात येणार असल्याची माहिती दिली. अहिल्यादेवींच्या जन्म त्रिशताब्दी निमित्त त्यांचा हा सुशोभीत आणि पुष्पमंडित पुतळा तयार करण्यात येत आहे.

****

ग्रामीण भागातल्या स्मशानभूमींसंदर्भातल्या समस्या सोडवण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनानं ‘स्मशानभूमी समस्या निवारण अभियान’ राबवण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व गावांना सुसज्ज स्मशानभूमी उपलब्ध करून देणं, ७/१२ नोंदी सुनिश्चित करणं, स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यांचं सुशोभीकरण करणं, ही या अभियानाची उद्दिष्टं आहेत. हे अभियान एकूण पाच टप्प्यांमध्ये राबवण्यात येणार असून, मे महिना अखेरपर्यंत जिल्ह्यातल्या सर्व स्मशानभूमींच्या समस्या सोडवण्यात आलेल्या असतील, असं नियोजन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. हा उपक्रम केवळ शासकीय योजना नसून, लोकसहभागानं आणि जनजागृती करून यात यश मिळेल, असं ते म्हणाले.

****

स्वच्छ भारत अभियान २०२५ अंतर्गत केंद्रीय शहरी विकास मंत्रालयाच्या स्वच्छ संरक्षणाच्या अनुषंगाने सहासदस्यीय केंद्रीय पथकाने अकोला शहरात पाहणी केली. आगामी तीन महिन्यात स्वच्छ सर्वेक्षण २०२५ चा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. पथकाने शहरात अचानक भेट देत सार्वजनिक स्वच्छतागृहे, रस्ते, कचरा संकलन व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था तसंच भोड इथल्या बायोगॅस प्रकल्पाची पाहणी केली.

****

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी काल नांदेड विभागातल्या नगरसोल ते औरंगाबाद रेल्वेमार्गांवर तपासणी केली. या दौऱ्यात विविध पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला आणि भविष्यातली सुरक्षा आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीनं महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, मध्य रेल्वेनं उन्हाळ्यासाठी मुंबई - आदिलाबाद - मुंबई या विशेष गाडीच्या बारा फेऱ्या करण्याची घोषणा केली आहे. १० एप्रिल ते २६ जूनपर्यंत या फेऱ्या होणार आहेत.

नांदेड विभागात २३ एप्रिल पर्यंत नंदापूर-धामणी दरम्यान लाईन ब्लॉक घेण्यात आला आहे, यामुळे पूर्णा-अकोला-पूर्णा ही गाडी नियमित वेळेच्या एक तास उशिरानं धावणार असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेनं कळवलं आहे.

****

अर्जेंटिनामध्ये सुरू असलेल्या आय एस एस एफ विश्वकरंडक स्पर्धेत, काल विजयवीर सिधू याने पुरूषांच्या २५ मीटर रॅपीड फायर पिस्तुल प्रकारात भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. तर महिला श्रेणीत सुरूची सिंगनं १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक पटकावलं.

****

राज्यातल्या बहुतांश भागात पुढचे दोन दिवस तापमान वाढण्याचा अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे. मराठवाड्यातल्या सर्वच जिल्ह्यात तापमान ४१ अंशाच्या वर गेलं आहे. मुंबई, ठाणे, पालघर, कोकणात बहुतांश भागात हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे. विदर्भात अकोला, अमरावती, चंद्रपूरमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात घाटमाथ्यावर विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता वेधशाळेने वर्तवली आहे.

****